जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

29 JUL 2025
तरुण भारत

# शिवाजी विद्यापीठ परिसर फुलला

## पावसामुळे परिसर हिरवागार : परिसरातील तळी, विहिरीही भरल्या

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठाची जैवविविधतेचे केंद्रच म्हणून ओळख आहे. पावसामुळे ८५६ एकर परिसरात विविध वनस्पती फुलल्या आहेत. रंगीबेरंगी फुलांची चादर परिसरात पसरली आहे. ही जैवविविधता पाहण्यासाठी अनेक लोक विद्यापीठ परिसरात फिरत असतात. ही हिरवळ पाहून कोणाचेही मन प्रसन्न होईल, असे वातावरण आहे.


**कोल्हापूर : पावसामुळे शिवाजी विद्यापीठ परिसरात हिरवीगार झालेली जैवविविधता.**

शिवाजी विद्यापीठ परिसरात दीड हजार दुर्मिळ वनस्पती पाहायला मिळतात. सध्या पाऊस सुरू असल्याने या वनस्पती हिरव्यागार झाल्या आहेत.

काही वनस्पतींना रंगीबेरंगी फुले आल्याने परिसर आकर्षक दिसतो आहे. त्यामुळे सकाळी सहा वाजल्यापासून ते सायंकाळी सहा वाजेपर्यंत अनेक लोक परिसरात फिरत असतात. विद्यापीठातील सर्व तळीही काठोकाठ भरली असून, अनेक पक्षांनी हजेरी लावली आहे.

### विद्यापीठातील तळी, विहिरी भरल्या

शिवाजी विद्यापीठ परिसरातील तळी आणि विहरी काठोकाठ भरल्या आहेत. नाट्य व संगीतशास्त्र विभागाजवळील तळ्यावर सकाळपासून विद्यार्थ्यांसह नागरिकांची गर्दी असते. सेल्फी पॉईंटवर जाऊन सेल्फी काढण्याचा मोह कोणालाच आवरत नाही. तळ्यातील पक्षी आणि मासे पाहण्यासाठी विद्यार्थ्यांची धडपड सुरू असते. नयनरम्य दृश्य डोळ्यात साठवून लोक समाधान व्यक्त करतात. पाऊस सुरू असताना भाषा भवन पाठीमागील तळ्यात धबधबा वाहात असतो. हा धबधबा पाहून फिरायला येणाऱ्यांचा आनंद व्दिगुणीत होतो.

विद्यापीठ परिसरातील पक्षांसह इतर पक्षीही या तळयांमध्ये पोहताना दिसतात. झाड, पान, फुलांनी बह–रलेला विद्यापीठ परिसर सर्वांचे लक्ष वेधून घेत आहे. पावसाच्या सरी येत असताना मधूनच एखादा मोर थुई थुई नाचताना दिसतो. त्यामुळे फिरायला आलेले लोक आवाज न करता या मोराला आपल्या मोबाईलच्या कॅमेरात कैद करताना दिसतात. चिमण्यांचा चिवचिवाट ऐकूण एखाद्याला लागलेली तंद्रीचा भंग होतो. या शिक्षण मंदिर परिसरात दुर्मिळ वनस्पती, पक्षांचे दर्शन होत आहे. या परिसरात गर्दी वाढत आहे.

2 9 JUL 2025

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील संख्याशास्त्र अधिविभागात आयोजित व्यवस्थापन विकास कार्यक्रमास उपस्थित मार्गदर्शक, अधिकारी व

# डेटा विश्लेषण व्यवस्थापनावर मार्गदर्श

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठाचा संख्याशास्त्र अधिविभाग आणि गुरुवर्य लक्ष्मणराव इनामदार सहकारी प्रशिक्षण केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने डेटा विश्लेषण कार्यक्रम झाला. रामानुजन सभागृहात झालेल्या कार्यक्रमाच्या अध्यक्षपदी डॉ. महादेव देशमुख होते.

कोल्हापूर जिल्हा नागरी बँक्स सहकारी असोसिएशन लिमिटेड यांच्या सहकार्याने पी. एम.-उषा प्रायोजित 'डेटा विश्लेषण व बँकिंग

- संख्याशास्त्र विभागात प्रात्यक्षिकांसह मार्गदर्शन

नियामक अनुपालनासाठी मायक्रोसॉफ्ट एक्सेलचा वापर' या विषयावर एक दिवसीय व्यवस्थापन विकास कार्यक्रम घेतला. सहकारी बँकांतील अधिकारी व कर्मचाऱ्यांना एक्सेल वापरून डेटा व्यवस्थापन, विश्लेषण, असेट लायबलिटी मॅनेजमेंट करता येते. नियामक अनुपालन यासंदर्भातील व्यावहारिक प्रशिक्षण प्रदान देणे उद्दिष्ट होते.

एक्सेलमधील मूलभूत टूल्स व फंक्शन्स, बँकिंग नियामक निकषांनुसार अहवाल तयार करणे, प्रत्यक्ष बँकिंग डेटावर आधारित प्रात्यक्षिक दाखवण्यात आली. डॉ. सोमनाथ पवार यांनी एक्सेलच्या वापराची मूलभूत माहिती दिली. महत्त्वाची साधने व बँकिंगसाठी उपयुक्त फंक्शन्स यासंदर्भात मार्गदर्शन केले. आरबीएल बँक वित्त व्यवस्थापक रमेश लोणार यांनी असेट लायबलिटी मॅनेजमेंट व नियामक अनुपालन या विषयांवर मार्गदर्शन केले.

दुपारच्या सत्रात एस. व्ही. राजगुरू यांनी प्रत्य आधारित प्रशिक्षण दि जिल्ह्यातील विविध बँकांमधील ६० अधि कर्मचाऱ्यांनी सहभाग डॉ. राजन पडवळ य केले. अनिल नाग डॉ. शशीभूषण मह प्रस्ताविक केली. ड पवार यांनी आभार म विभागप्रमुख डॉ. महाडिक, एस. व्ही. सचिन पाटील, आ होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
29 JUL 2025
सकाळ

# 'बी.एस्सी. बी.एड.' अभ्यासक्रमास प्रारंभ

कोल्हापूर, ता. २८ : शिवाजी विद्यापीठाच्या शिक्षणशास्त्र अधिविभागात बी.एस्सी. बी.एड्. (आय.टी.ई.पी.) अभ्यासक्रमाचे नुकतेच उद्घाटन करण्यात आले. यावेळी प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. प्र-कुलगुरू डॉ. पाटील यांनी, योग्य मार्गदर्शन, जिज्ञासा, संशोधक वृत्ती व अभ्यासामध्ये सातत्य ठेवल्यास विद्यार्थी आपले ध्येय नक्कीच गाठू शकतात, असे सांगितले. शिक्षणशास्त्र आधिविभागाच्या प्रमुख डॉ. चेतना सोनकांबळे यांनी प्रास्ताविक केले. बी.एस्सी. बी.एड्. (इंटिग्रेटेड टीचर एज्युकेशन प्रोग्राम) अभ्यासक्रमाच्या समन्वयक डॉ. रूपाली संकपाळ यांनी अभ्यासक्रमाविषयी माहिती दिली. निशांत कुमार यांनी प्रमुख पाहुण्यांचा परिचय करून दिला. यावेळी डॉ. अंजली गायकवाड, सारिका पाटील, साबिया बागवान, संगीता चंदनवाले, संजना भालकर, संगीता माने, अतुल जाधव यांच्यासह विद्यार्थी, पालक उपस्थित होते. मोहम्मद कौनेन रझा यांनी आभार मानले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
29 JUL 2025
तरुण भारत

# विदेशी भाषा प्रवेशासाठी अर्ज भरण्यास मुदतवाढ

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठातील विदेशी भाषा विभागातील सन २०२५-२०२६ या शैक्षणिक वर्षासाठीच्या प्रवेशाला मुदतवाढ दिली आहे. रशियन, जर्मन, जपानी व पोर्तुगीज भाषा प्रमाणपत्र अभ्यासक्रमांना ३१ जुलैपर्यंत प्रवेश घेता येणार आहेत.

शिवाजी विद्यापीठातील विदेशी भाषा विभागात एक वर्षाचे रशियन, जर्मन, जपानी, पोर्तुगीज प्रमाणपत्र अभ्यासक्रम आहेत. या अभ्यासक्रमांची प्रवेश क्षमता प्रत्येकी ५० आहे. बारावी उत्तीर्ण कोणीही या अभ्यासक्रमाला प्रवेश घेवू शकतात. दररोज सायंकाळी एक तास वर्ग असतात. इतर अभ्यासक्रम व नोकरी करतही भाषा अभ्यासक्रमाचे शिक्षण घेता येते. या अभ्यासक्रमाच्या माध्यमातून आंतरराष्ट्रीय पातळीवरील भाषा प्राविण्य परीक्षाही देता येतात. विदेशी भाषा अवगत असणाऱ्यांना उद्योग, सेवा क्षेत्र, बिझनेस, पर्यटन, हॉटेल व्यवसाय, निर्यात क्षेत्र, सांस्कृतिक आदानप्रदान आदी क्षेत्रांत करिअर संधी उपलब्ध आहे. अधिक माहितीसाठी विदेशी भाषा विभागाच्या कार्यालयात संपर्क साधावा, असे आवाहन डॉ. मेघा पानसरे यांनी केले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
29 JUL 2025
तरुण भारत

# बी.एस्सी. बी.एड. एकात्मिक अभ्यासक्रमाला प्रारंभ

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या शिक्षणशास्त्र अधिविभागात बी. एस्सी. बी. एड्. (आय.टी.ई.पी.) अभ्यासक्रम सुरू केला आहे. या अभ्यासक्रमाचे उद्घाटन प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. शिक्षणशास्त्र आधिविभागाच्या प्रमुख डॉ. चेतना सोनकांबळे यांनी स्वागत केले. बी.एस्सी. बी.एड्. अभ्यासक्रमाच्या समन्वयक डॉ. रूपाली संकपाळ यांनी अभ्यासक्रमाची माहिती दिली. निशांत कुमार यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. मोहम्मद कौनेन रझा यांनी आभार मानले. यावेळी डॉ. अंजली गायकवाड, सारिका पाटील, साबिया बागवान, संगीता चंदनवाले, संजना भालकर, संगीता माने, अतुल जाधव आदी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
29 JUL 2025
सकाळ

# विदेशी भाषा प्रवेशासाठी अर्ज भरण्यास मुदतवाढ

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठातील विदेशी भाषा विभागातर्फे सन २०२५-२०२६ या शैक्षणिक वर्षासाठी घेण्यात येणाऱ्या रशियन, जर्मन, जपानी व पोर्तुगीज भाषा प्रमाणपत्र अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी अर्ज भरण्याची मुदत ३१ जुलैपर्यंत वाढविण्यात आली आहे. या विभागातर्फे एक वर्ष कालावधीचे रशियन, जर्मन, जपानी व पोर्तुगीज भाषा प्रमाणपत्र अभ्यासक्रम घेण्यात येतात. या अभ्यासक्रमांची प्रवेश क्षमता प्रत्येकी ५० इतकी आहे. यासाठी बारावी उत्तीर्ण अशी प्रवेश अर्हता आहे. रोज सायंकाळी एक तास याप्रमाणे वर्ग असतात. तसेच हे अभ्यासक्रम करून आंतरराष्ट्रीय स्तरावरील भाषा प्रावीण्य परीक्षाही देता येतात. विदेशी भाषा अवगत असणाऱ्या विद्यार्थी-युवकांसाठी उद्योग, सेवाक्षेत्र, बिझनेस, पर्यटन, हॉटेल व्यवसाय, निर्यात क्षेत्र, सांस्कृतिक आदानप्रदान अशा विविध क्षेत्रांत अनेक प्रकारच्या करिअर संधी उपलब्ध आहेत. प्रवेशासंबंधी अधिक माहितीसाठी विदेशी भाषा विभाग कार्यालय वि. स. खांडेकर भाषा भवन येथे संपर्क साधावा, असे आवाहन अधिविभाग प्रमुख डॉ. मेघा पानसरे यांनी केले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
2 9 JUL 2025
पुढारी

# दूरशिक्षण अभ्यासक्रम प्रवेश; ३१ जुलै अर्जाची मुदत

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठ दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्राच्या



दूरशिक्षण अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी ३१ जुलै ही अर्जाची मुदत आहे.

शैक्षणिक वर्ष २०२५-२६ बी. ए., बी.कॉम, एम.ए. (मराठी, हिंदी, इंग्रजी, समाजशास्त्र, राज्यशास्त्र, अर्थशास्त्र, इतिहास), एम.कॉम., एम.एस्सी. (गणित), एम.बी.ए, (डिस्टन्स) तसेच एम.कॉम., एम.एस्सी. (गणित), एम.बी.ए. (ऑनलाईन मोड) अभ्यासक्रमाच्या प्रवेश प्रक्रियेची ही मुदत आहे. केंद्राच्या सर्व अभ्यासक्रमांची प्रवेश प्रक्रिया सुरू आहे. त्यामुळे ज्यांचे शिक्षण अपूर्ण आहे, अशांना दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्राच्या ८७ अभ्यास केंद्रात प्रवेशाची संधी मिळणार आहे. त्यासाठी शिवाजी विद्यापीठाच्या www.unishivaji.ac. in या संकेतस्थळावर Distance Education लिंकवर प्रवेशाबाबतची माहिती उपलब्ध असून http:///sukapps.unishivaji.ac.in/studentregistration/#/ या ऑनलाईन लिंकवर प्रवेश निश्चित करावा, असे आवाहन प्र. संचालक डॉ. के. बी. पाटील यांनी केले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
29 JUL 2025
पुण्यनगरी

# विदेशी भाषा प्रवेशासाठी मुदतवाढ

**कोल्हापूर :** चालू शैक्षणिक वर्षासाठी शिवाजी विद्यापीठातील विदेशी भाषा विभागातर्फे घेण्यात येणाऱ्या रशियन, जर्मन, जपानी व पोर्तुगीज भाषा प्रमाणपत्र अभ्यासक्रम प्रवेशासाठी अर्ज भरण्यासाठी गुरुवार, दि. ३१ पर्यंत मुदत वाढवली आहे. अधिक माहितीसाठी विदेशी भाषा विभाग कार्यालय, शिवाजी विद्यापीठ येथे संपर्क साधावा, असे आवाहन अधिविभागप्रमुख डॉ. मेघा पानसरे यांनी केले आहे.

जनसंपर्क कक्ष
2 9 JUL 2025
सकाळ, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# ॲथलेटिक्समध्ये जिद्द, चिकाटी आवश्यक

## आर. व्ही. शेटगे : राज्यस्तरीय ॲथलेटिक्स कार्यशाळा उत्साहात

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. २८ : 'ॲथलेटिक्स क्षेत्रात यशस्वी वाटचाल करण्यासाठी जिद्द, चिकाटी आणि नियमितपणा अत्यावश्यक आहे,' असे प्रतिपादन शिवछत्रपती पुरस्कारप्राप्त आर. व्ही. शेटगे यांनी केले. जिल्हा ॲथलेटिक्स असोसिएशन व शिवाजी विद्यापीठ क्रीडा विभाग आणि देशभक्त रत्नाप्पा कुंभार कॉलेज ऑफ कॉमर्स आयोजित दोनदिवसीय राज्यस्तरीय ॲथलेटिक्स कार्यशाळेच्या समारोपप्रसंगी ते बोलत होते.



कोल्हापूर : देशभक्त रत्नाप्पा कुंभार कॉलेज ऑफ कॉमर्समध्ये झालेल्या राज्यस्तरीय ॲथलेटिक्स कार्यशाळेच्या समारोपप्रसंगी आर. व्ही. शेटगे यांनी मार्गदर्शन केले. यावेळी उपस्थित राकेश सावे, प्रा. रामा पाटील, एस. व्ही. सूर्यवंशी, सुभाष पवार, अमोल आळवेकर, प्रा. प्रकुल मांगोरे-पाटील आदी.

देशभक्त रत्नाप्पा कुंभार कॉलेज ऑफ कॉमर्समध्ये झालेल्या कार्यशाळेत कोल्हापूरसह सांगली, सातारा, सोलापूर, लातूर आदी भागांतून ७५ क्रीडा प्रशिक्षक, शिक्षक सहभागी झाले होते.

जिल्हा ॲथलेटिक्स असोसिएशनचे अध्यक्ष एस. व्ही. सूर्यवंशी म्हणाले, 'ॲथलेटिक्समध्ये उच्चस्तरीय कामगिरीपर्यंत पोहोचण्यासाठी नियमितता, सातत्याने बदलत जाणाऱ्या नियमांचा अभ्यास, निरनिराळ्या स्पर्धांमध्ये पंचगिरी करावी.'

पहिल्या दिवशी झालेल्या सत्रात आंतरराष्ट्रीय पंच राकेश सावे यांनी कॉल रूम, ट्रॅक व फील्ड इव्हेंटस नियम, अडथळा शर्यत, रिले, रेस वॉकिंग, रोड रेस, क्रॉसकंट्रीसह अन्य स्पर्धाविषयक माहिती दिली. तर उडी प्रकार, फेक प्रकार, द किंग, प्रोटेस्ट नियम, प्रश्नोत्तर घेतली. दुसऱ्या दिवशीच्या सत्रात आंतरराष्ट्रीय प्रशिक्षक सुभाष पवार यांनी डोपिंगच्या धोक्यांविषयी मार्गदर्शन केले.

आंतरराष्ट्रीय प्रशिक्षक सुभाष पवार यांनी डोपिंगच्या धोक्यांविषयी मार्गदर्शन केले. त्यानंतर राकेश सावे यांनी उडी प्रकार, फेक प्रकार, प्रोटेस्ट नियम व प्रश्नोत्तर सत्र घेतले. कार्यशाळेसाठी परिश्रम घेणाऱ्या अश्विनी मांगोरे-पाटील, प्रा. नवनाथ पुजारी, अमोल आळवेकर, महेश मांगले, रोहन माने, सौरभ बावडेकर यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी वरिष्ठ प्रशिक्षक जालिंदर मेढे, आंतरराष्ट्रीय खेळाडू प्रा. रामा पाटील, असोसिएशनचे सचिव प्रा. प्रकुल मांगोरे-पाटील आदी उपस्थित होते.